क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/२८०५/१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- ०९.१०.२०१४

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती ------------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**मुक्काम ----------------------- पोष्ट --------------------**

**तालुका ---------------------- जिल्हाः यवतमाळ.**

**मार्फत :-** **गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------------**

दिनांक २५.०९.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. -----------------------------------------------------
-------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. -------------------------------------- खासदार / आमदार.
मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका --------------------
जिल्हा-------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ------------------------------------------ जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------ (सर्व)

****

**दिनांक २५.०९.१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.**

दिनांक २५. ०९ . २०१४ रोजी दुपारी १- ०० वाजता स्थायी समितीचे सभागृहात स्थायी समिती सभा घेण्यात आली. सभेला जि. प.चे खालील मा. पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा.सौ. आरतीताई ह. फुपाटे | सभापती, (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ | मा.श्री.अनिल शं. मांगुळकर | उपाध्यक्ष, जि.प. यवतमाळ |
| मा. श्री. सुभाष म. ठोकळ | सभापती बांध. व अर्थ स. | मा. श्री.प्रभाकर रा. उईके | सभापती (स.क.स.) |
| सन्मा. श्री.अनिल भ. नरवाडे | सदस्य | सन्मा. श्री. अमन ह. गावंडे | सदस्य |
| सन्मा. श्री. दिवाकर ध. राठोड | सदस्य | - | - |
| **आमंत्रीत अधिकारी** | | | |
| डॉ. श्री. शरद कुलकर्णी | अति. मु.का.अ. | श्री.अरुण मोहोड | उप मु. का.अ. (सा.) |
| श्री. आर.जि.बिजवे (प्रति.) | उप मु. का.अ.(म.व.बा.क.) | श्री.सुरेश शहापुरकर | मु.ले.व वि.अ. |
| श्री.एल.आर.वाघमारे (प्रतिनिधी) | उप अभि. जि.प.बांध.उपवि क्र.१ | श्री. ए.एम.नितनवरे | का.अ.बांधकाम क्र.२ |
| श्री. शि.वा.वद्देवार | कार्य.अभि.(सिंचन) | श्री. के.टी उमाळकर | का.अ.(पा.पु.) |
| डॉ. के.झेड. राठोड | जि.आ.अ. | डॉ. श्री.दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधि. |
| श्री.सी.आर. भावसार | उप मु.का.अ.(नरेगा) | श्री.जे.आर.राठोड, | कृषि विकास अधिकारी |
| सौ. सुचिता पाटेकर | शि.अ. (प्राथ.) जि.प. यवत. | श्री.एस.जी.वसावे | शि.अ.(माध्य.) |
| श्री. एम.एम. गवई (प्रतिनिधी) | समाज कल्याण अधिकारी | श्री.,एस.एस.कनाके | वाहतुक पर्यवेक्षक |
| श्री.अ.वि.सुने (प्रतिनिधी) | जि.ग्रा.वि.यं.यवतमाळ | श्री. ए.वाय. पाटील | उप अभि. PMGSY |
| श्री. अब्दुल रफिक (प्रतिनिधी) | का.अ.म.जि.प्रा.यवतमाळ | श्री.मनोज निरंजने (प्रति) | उपसंचालक सा.वनि.वि. |
| श्री. विश्वास वालदे | वरि. भु वै.भु.स.वि.य.यवत | श्री.आर.के. पवार | क.अभि. |
| श्री.एन.यु. राऊत | क.प्र.अ.पंचायत विभाग | श्री.डी.पी.घुने | शा.अ.म.जि.प्रा. |
| श्री.एच.आर. मोदाणी | क.ले.अ. वित्त विभाग | श्री. विजय पारवानी | स्विय सहा. मु.का.अ. |
| श्री.भानुदास चरडे | स्वियसहा.उप.मु.का.अ.(सा.) | श्री. आर.बी.कोम्बे | स्विय सहा.सभा.म.व बाक |
| श्री. पी.के.भोंग | स्वि.सहा.मा.अध्यक्ष,जि.प | श्री.एन.पी.कोडगीरवार | क.प्र.अ. सा.प्र.वि. |
| श्री. उत्तम बेजलवार | स्वि.सहा.सभा. बांध व अर्थ. | श्री. श्रीकांत मडावी | कनि.सहा. सा. प्र. वि. |
| श्री.डी.एम.ठाकरे | आ.सहा.जि.आ.अ. | | |

सर्वप्रथम सचिवांनी मा. पदाधिकारी व सन्मा. स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष, जि.प. यवतमाळ तथा (सभापती , स्थायी समिती ) यांचे पुर्वपरवानगीने सभेचे पुढील कामकाज सुरु करण्यापुर्वी सर्व खाते प्रमुखांनी मा.अध्यक्षा तथा (सभापती , स्थायी समिती ) यांना ओळख दिली.

**सन्मा.सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी कार्यकारी अभियंता, बांध-क्र. १ श्री. तपासे हे स्थायी समिती सभेस वारंवार गैरहजर राहत असल्याबाबत मुद्दा उपस्थित करुन त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी असे सांगीतले असता **मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी कोणत्याही सभेला अनुपस्थित राहण्याकरीता मा.अध्यक्ष व सचिवाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याबाबत सर्व खाते प्रमुखांना यापुर्वी सुचना देण्यात आले असल्याचे सांगीतले. त्यावर **मा.अध्यक्ष तथा(सभापती,स्थायी समिती )** यांनी यापुढे कोणत्याही खाते प्रमुखांनी सभेला अनुपस्थित राहण्याकरिता पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याचे सांगुन व तसे लेखी कळविणे बंधनकारक राहील, याबाबतचे निर्देश सर्व खातेप्रमुखाला दिले.

**सन्मा.सदस्य श्री.देवानंद न. पवार** यांनी मागिल सभेत सन २०११-१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती मधून शाळा दुरूस्तीसाठी प्राप्त झालेला निधी रु.५लक्षचे चौकशी बाबतचा अहवाल मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी सादर केल्यानुसार संबंधीतावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे सांगीतले असता **मा.अध्यक्ष तथा(सभापती,स्थायी समिती )** यांनी चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश सचिवास दिले.

**सन्मा. सदस्य श्री. राहूल मा. ठाकरे** यांनी मागील सभेत मौजा वाघापूर येथील ग्रा.पं.सचिव श्री. जगताप यांचेवरील भ्रष्टाचाराबाबत त्याचेवर कार्यवाही करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता त्यावर कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत) यांनी ग.वि.अ.कडुन अहवाल प्राप्त झाला असल्याचे सांगुन अहवालाचे अनुषंगाने श्री. जगताप सचिव यांचेवर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत एस. सी. समाजाच्या लोकांना शौचालयासाठी मागील दोन वर्षाचा निधी उपलब्ध झाला नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **का.अ.(पा.पु)** यांनी याबाबतचा निधी माहे डिसेंबर २०१४ मध्ये येतो, त्यामुळे माहे डिसेंबर मध्ये निधी देण्यात येईल असे सांगितले.

**सन्मा.सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी मागील सभेत महागांव पं.स.मधील ग्रामपंचायत अंतर्गत लावण्यात आलेले सौर पथदिवे बंद स्थितीत असल्याने सौर पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती कोणाकडे आहे याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **मा.उप मु.का.अ.(सा.)** यांनी विभागामार्फत ग्राम पंचायतीला वाटप केलेल्या सौर पथदिव्याबाबतचे पत्र पाहण्यात यावे व त्यावरून माहिती गोळा करून सन्मा.सदस्यांना पुरविण्या बाबतचे निर्देश उप मु.का.अ.(पंचायत ) यांचे प्रतिनिधी ला दिले.

तसेच मागील सभेतील विषय क्र. ७ चे अनुषंगाने **सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी साप्ताहीक ग्रामवार्ता यवतमाळ या वृत्तपत्राचा खप किती आहे व किती आवृत्ती निघतात याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुसार सर्व सन्मा.सदस्यांना साप्ताहीक ग्रामवार्ता यवतमाळ वृत्तपत्राचे प्रति पहावयास उपलब्ध करुन देण्यात आले.

**मा. तत्का. सभापती (महिला व बालकल्याण)** यांनी मागील सभेत मोहदा येथील पाणी पुरवठा इस्टीमेटचे कामकाजा बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **का. अ. (पा.पु.)** यांनी नदीला पाणी असल्यामुळे ते काम हल्ली करता येणार नसल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी यापुर्वी स्थायी समिती मध्ये शिक्षण विभागाकडील प्रस्तावित बांधकामांना रु.५० लाखाकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु त्यावेळी प्रस्तावासोबत सविस्तर टीपणी अथवा लाभ्यार्थ्यांची नांवे दर्शविण्यात आली नसल्याचे सांगुन यापुढे रु.५० लक्षचे कोणत्याही विषयास प्रशासकीय मान्यतेबाबतचा ठराव घेतांना विषयासोबत सविस्तर टीपणी व लाभार्थ्यांची सुची देण्यात यावी असे मत व्यक्त केले. त्यावर **मा.उपाध्यक्ष** यांनी ज्या समितीचा अधिकार आहे, त्या समितीमध्ये लाभार्थ्यांची यादी अंतिम केली जात असल्याचे सांगीतले. त्याचप्रमाणे **मा.अति.मु.का.अ.**यांनी यापुढे घेण्यात येणा-या प्रस्तावा सोबत लाभार्थ्यांचे यादीसह प्रशासकीय मान्यता घेण्याबाबतचे निर्देश विभागप्रमुखांना दिले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत वस्ती शाळेच्या शिक्षकांच्या कालावधी बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **शि.अ (प्राथ.)** यांनी वस्ती शाळा शिक्षक सन २००२ पासून कार्यरत असल्याचे सांगुन नियमानुसार कार्यवाही करण्यात आली असल्याचे सांगीतले.

वरीलप्रमाणे दिनांक ३०.०८.२०१४ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्त वाचन करुन कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**विषय क्र.२ :- शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

उप मु.का.अ.(म.ग्रा.रो.ह.यो) यांनी राज्य रोहयो अंतर्गत घेण्यात येणा-या धडक सिंचन विहीर योजनेतील प्रगतीपथावरील पात्र लाभार्थ्यांच्या विहीरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वर्ग करणेबाबत अवर सचिव, म.शा. यांचे क्र.योजना-२०१४/प्र.क्र.१२३/ रोहयो -५/ नियोजन विभाग दि. ०६ सप्टेंबर २०१४ चे वाचन केले.

**विषयपत्रीकेवरील विषय संपल्यानंतर खालीलप्रमाणे चर्चा घडुन आली.**

**सन्मा.सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी २ हेक्टर ०२ आर जमीनधारण करणाऱ्या शेतकऱ्याला धडकसिंचन/अल्पभूधारक योजनेमध्ये समावेश करण्यात यावा तसेच ०२ आर जमीनी बाबतची अट शिथील करण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी बाभुळगाव तालुक्यातील मौजा चिमणा बागापूर येथील शेत सर्व्हे नंबर ३० चा ७/१२ काढलेला असुन मजुराच्या मृत्यूचा दाखला जोडलेला आहे परंतु सदर मजुर कामावरच नव्हता, या संदर्भात सबंधितांकडे स्मरणपत्र व तक्रार दिलेली आहे तरी तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात यावी असे सांगीतले. त्यावर **मा.अध्यक्ष तथा (सभापती, स्थायी समिती )** यांनी उक्त प्रकरणी लक्ष घालावे व जे कोणी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे,असे सांगुन या संदर्भात चौकशी करण्याबाबतचे निर्देश उप मु.का.अ. (म.ग्रा.रो.ह.यो) यांना दिले.

विषय पत्रीकेवरील विषय व चर्चा संपल्यानंतर सभागृहाने कामकाजात भाग घेऊन सहकार्य केल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानुन **मा. अध्यक्ष तथा सभापती (स्थायी समिती ) जि. प. यवतमाळ** यांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे सचिवांनी जाहीर केले.

**सचिव,**
**स्थायी समिती,**
**जि.प.यवतमाळ**

**सभापती,**
**स्थायी समिती**
**जि.प.यवतमाळ**